...\My Documents\tmp\VIRNAK\MAHILA\PARIPATRAK-SUDHARIT-MAHILA-PROPERTY.doc

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## करआकारणी व करसंकलन विभाग

| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | सामान्य करात सूटीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/६/कावि/१२७४/२०१३, दिनांक - ३०/०३/२०१३ |
| विषय | फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस सामान्यकरात ५० टक्के सूट देणेबाबत |
| अंमलबजावणी कालावधी | |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट प्रमुख |
| संदर्भ | १. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/६/कावि/२६५/२०११, दिनांक - १४/०६/२०११<br>२. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/६/कावि/२६८/२०११, दिनांक १५/०६/२०११<br>३. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/६/कावि/४७१/२०११, दिनांक ०३/०८/२०११<br>४. महापालिका सभा ठराव क्रमांक २२४, दिनांक २०/०२/२०१३ |

**परिपत्रक**

उपरोक्त संदर्भिय क्रमांक १ चे परिपत्रकान्वये फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस सामान्यकरात १०% सूट देण्याचे धोरण अंमलात होते. सदरचे परिपत्रक रद्द करणेत येत आहे. महापालिका सभेने ठराव क्रमांक २२४ दिनांक २०/०२/२०१३ अन्वये फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस सामान्य करात ५०% सूटीबाबत सुधारित धोरण सन २०१३-२०१४ पासून ठरविले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदी विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश निर्गत करणेत येत आहेत.

१) महापालिका हद्दीतील फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील सामान्यकरात ५०% सूट लागू राहिल.
२) सामान्यकरातील सूट फक्त चालू मागणीच्या देय मालमत्ता करातील फक्त सामान्यकर (सामान्य करामध्ये सामान्य कर + अग्निशामक + शिक्षण उपकर + साफसफाई कर हे कर समाविष्ट आहेत) रक्कमेवर देय राहिल.
३) संबंधित मिळकतींचा मालकी हक्क असल्याचे कायदेशीर कागदपत्र (रजिस्टर्ड खरेदी खत, वारस प्रमाणपत्र, रजिस्टर्ड बक्षीस पत्र इ.) संबंधित महिलेचे नावे असणे अनिवार्य राहिल.
४) सामान्यकरातील सूट सन २०१३-२०१४ पासून लागू राहिल.
५) बिगरनिवासी व मिश्र वापरासाठी असलेल्या मिळकतीस सदर सवलत अनुदेय असणार नाही.
६) सदर सवलतीचा लाभ हा संबंधित महिलेस त्यांचे फक्त एकाच रहात्या निवासी मिळकतीसाठी लागू असेल. संबंधित महिलेस अन्य कुठल्याही ठिकाणी मालमत्ताकरात सवलत घेत नाही, असे रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सवलतीस पात्र ठरविणेचे वेळी सादर करावे लागेल. त्यापुढे दरवर्षी सवलतीचा लाभ घेणेकामी साध्या कागदावर वचन चिठ्ठी (Undertaking) व अर्ज सादर करावा लागेल.
७) करसंकलन विभागामार्फत सामान्य करातील सवलतीबाबत अंमलात असलेल्या कोणत्याही एकाच योजनेचा लाभ मिळकतधारकास घेता येईल.
८) सदर सूटीचा लाभ घेण्यासाठी संबंधित महिलेस थकबाकीसह सूटीची रक्कम वगळता संपूर्ण रक्कम भरणे अनिवार्य राहिल. तथापि सदर सूटीचा लाभ घेणेकामी संबंधितास सरकारी वर्षाचे दिनांक ३० जून पूर्वी रक्कम भरणे अनिवार्य राहिल.
९) फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस सामान्यकरात द्यावयाचे ५०% सूट देणेबाबत परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/६/कावि/२६८/२०११, दिनांक १५/०६/२०११ व परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/६/कावि/४६१/२०११, दिनांक ०३/०८/२०११ मध्ये नमूद केलेनुसार सर्व साधारण कार्यवाही करावी.
१०) फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस सामान्यकरात द्यावयाचे ५०% सूट देणेबाबत सहाय्यक मंडलाधिकारी यांना अधिकार राहतील.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.

प्रति,
१) प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी, --------------- विभागीय कार्यालय

प्रत :
१) मुख्य लेखापरिक्षण विभाग २) लेखा विभाग ३) संगणक विभाग ४) मे. प्रॉबिटी सॉफ्ट प्रा.लि.,